ePaper
हिमाचल प्रदेशात पावसाचं तांडव...! 155 जणांचा मृत्यू, 250 हून अधिक रस्ते बंद

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 12 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 3 वरुन...

पिंपरी-चिंचवड दुर्गंधीच्या विळख्यात

## राष्ट्रगीतासह संपूर्ण वंदे मातरम म्हणणे अनिवार्य; राष्ट्रपतींची विधेयकास मंजुरी

# भारत गाणार 'वंदे मातरम..!'

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ला आता राष्ट्रगीत 'जन-गण-मन'प्रमाणेच कायदेशीर संरक्षण मिळाले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी PREVENTION OF INSULTS TO NATIONAL HONOUR (AMENDMENT) BILL, 2026 ला मंजुरी दिल्यानंतर ही तरतूद लागू झाली आहे. या सुधारणेमुळे राष्ट्रीय गीताच्या गायनात जाणीवपूर्वक अडथळा आणणे किंवा गायन करणाऱ्या समूहात व्यत्यय निर्माण करणे हा दंडनीय गुन्हा ठरणार आहे.**

नव्या कायद्यानुसार अशा गुन्ह्यास तीन वर्षांपर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. दुसऱ्यांदा आणि त्यानंतरच्या दोषसिद्धीसाठी किमान एक वर्षाच्या कारावासाची तरतूद आहे. यापूर्वी १९७१ च्या कायद्यात अशा शिक्षेची तरतूद राष्ट्रगीताच्या संदर्भात होती; आता त्यात राष्ट्रीय गीताचाही समावेश करण्यात आला आहे.

दरम्यान, केंद्र सरकारने 'वंदे मातरम्'च्या गायनासाठी स्वतंत्र प्रोटोकॉलही निश्चित केला आहे. अधिकृत कार्यक्रमात राष्ट्रगीत आणि राष्ट्रीय गीत दोन्ही सादर केले जाणार असल्यास 'वंदे मातरम्' प्रथम सादर केले जाणार आहे. अधिकृत कार्यक्रमांसाठी गीताची सर्व सहा कडवी आणि त्यासाठी निश्चित कालावधी याबाबतही मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

या निर्णयाला 'वंदे मातरम्'च्या ऐतिहासिक योगदानाशी जोडण्यात आले आहे. स्वातंत्र्यलढ्यात या गीताने महत्त्वाची भूमिका बजावली होती. २४ जानेवारी १९५० रोजी घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी 'वंदे मातरम्'ला 'जन-गण-मन'इतकाच सन्मान दिला जावा, अशी भूमिका मांडली होती. नव्या कायदेशीर सुधारणेमुळे या भूमिकेला अधिकृत कायदेशीर आधार मिळाला आहे.

शाळा आणि सरकारी कार्यक्रमांतील प्रोटोकॉलमुळे 'वंदे मातरम्'च्या सादरीकरणाला आता अधिक महत्त्व मिळणार आहे. त्यामुळे राष्ट्रीय गीताच्या सन्मानाबाबतचे नियम अधिक स्पष्ट झाले असून, त्याचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाईचा मार्गही मोकळा झाला आहे.






### घटना समितीचा निर्णय अन् ऐतिहासिक संदर्भ

या विधेयकात २४ जानेवारी १९५० रोजी घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयाचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात बंकीमचंद्र चॅटर्जी लिखित 'वंदे मातरम' या गीताने अतुलनीय योगदान दिले होते. म्हणूनच, 'वंदे मातरम'ला राष्ट्रगीत 'जन गण मन'सारखाच दर्जा आणि सन्मान दिला गेला पाहिजे, अशी भूमिका घटना समितीने मांडली होती. कायद्यातील या सुधारणेमुळे घटना समितीच्या भूमिकेला आज कायदेशीर बळ मिळाले आहे.

### गृह मंत्रालयाचे महत्त्वाचे निर्देश आणि नवीन नियमावली

गृह मंत्रालयाने याआधीच 'वंदे मातरम'च्या गायनासंदर्भात एक विस्तृत नियमावली (प्रोटोकॉल) जारी केली आहे :

लाल किल्ल्यावरून प्रथमच गायन : यावर्षीच्या स्वातंत्र्यदिनी पहिल्यांदाच लाल किल्ल्यावरून 'वंदे मातरम'चे गायन केले जाणार आहे.

६ कडवी आणि वेळ : अधिकृत कार्यक्रमांमध्ये 'वंदे मातरम'ची सर्व ६ कडवी गायली जातील. यासाठी ३ मिनिटे १० सेकंदांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

प्राधान्यक्रम : कोणत्याही शासकीय कार्यक्रमात राष्ट्रगीत (जन-गण-मन) आणि राष्ट्रीय गीत एकत्र वाजवले किंवा गायले जाणार असल्यास, 'वंदे मातरम' प्रथम गायले जाईल.

आदर आणि शिस्त : राष्ट्रीय गीत सुरू असताना उपस्थितांना सावधान स्थितीत उभे राहणे बंधनकारक असेल.

शाळांमध्ये सुरुवात : देशातील सर्व शाळांमध्ये दैनंदिन कामकाजाची सुरुवात 'वंदे मातरम'च्या समूहगायनाने करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### अपराध केल्यास काय होणार शिक्षा?

नवीन कायद्यानुसार, 'वंदे मातरम'चे गायन रोखणे किंवा गायन चालू असताना त्यात अडथळा निर्माण करणे हा गंभीर गुन्हा मानला जाईल.
शिक्षेची तरतूद: असा गुन्हा करणाऱ्या व्यक्तीला ३ वर्षांपर्यंतचा कारावास, दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.
दुसऱ्यांदा गुन्हा केल्यास: जर एखाद्या व्यक्तीने हा गुन्हा पुन्हा केला, तर त्याला किमान १ वर्षाच्या कारावासाची तरतूद करण्यात आली आहे.

याआधी १९७१ च्या मूळ कायद्यात केवळ राष्ट्रगीत 'जन गण मन'च्या अवमानाबाबतच शिक्षेची तरतूद होती. 'वंदे मातरम'ला राष्ट्रीय गीताचा दर्जा असूनही असा कोणताही थेट कायदेशीर आधार उपलब्ध नव्हता. हीच त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र सरकारने कलम ३ मध्ये सुधारणा करून 'वंदे मातरम'चा यामध्ये समावेश केला आहे.

# हॉटेल-रेस्टॉरंट्सना 'एफडीए'चा दणका!

## पुण्यातील १४ हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्स सील, २४ जणांना अटक

**महाईन्यूज । पुणे**

**अन्न व औषध प्रशासनाने 'सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र' मोहिमेंतर्गत १ ते ९ ऑगस्टदरम्यान पुणे विभागातील विविध ठिकाणी तपासणी करून १२ आस्थापनांचे परवाने अथवा नोंदणी तात्काळ निलंबित केले. या कारवाईत मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला.**






या कारवाईत ४१.३६ लाखांचा प्रतिबंधित अन्नसाठा जप्त करण्यात आला. संबंधितांविरोधात पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून २४ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत १४ अन्न आस्थापना सील करण्यात आल्या असून चार वाहनेही जप्त करण्यात आली आहेत. जप्त वाहनांची किंमत सुमारे १४ लाख ९० हजार रुपये असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

दरम्यान, पुणे विभागात अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने एका वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये विनापरवाना विक्रीसाठी मावा स्वीट वाहतूक होत असल्याचे आढळले. या साठ्यातून अन्नपदार्थाचा नमुना विश्लेषणासाठी घेण्यात आला असून उर्वरित सुमारे ९८ किलो मावा स्वीटचा ९ लाख ८८ हजार ४०० रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. व्यावसायिकांना नियम पाळण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.

अन्न सुरक्षा प्रशासनाने हॉटेल, रेस्टॉरंट आणि बेकरी व्यावसायिकांना ग्राहकांना मोफत आणि शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, अन्नपदार्थांसाठी योग्य दर्जाचे 'फूड ग्रेड' साहित्य वापरणे, विनापरवाना व्यवसाय न करणे, वापरलेले तेल पुन्हा वापरू नये आणि मेन्यू कार्डवर दिशाभूल करणारी माहिती देऊ नये, असे आवाहन केले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भव्य तिरंगा रॅलीला उपस्थिती

**महाईन्यूज । पुणे**

**युवाशक्तीच्या सामर्थ्यावर उद्याचा विकसित भारत आणि सर्वांची स्वप्न पूर्ण करणारा, समतेचा, प्रगतीचा, युवांच्या स्वप्नांना बळ देणारा विकसित महाराष्ट्र घडेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**





'हर घर तिरंगा अभियान' अंतर्गत नामदार गोपाळकृष्ण गोखले मार्गावर आयोजित भव्य तिरंगा रॅलीला मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे, आमदार रवींद्र चव्हाण, उमा खापरे, अमित गोरखे, सिद्धार्थ शिरोळे, राहुल कुल, शंकर जगताप आदी उपस्थित होते.

'इस तिरंगे को हम कभी झुकने नहीं देंगे' हे सांगण्यासाठी तरुणाई आज तिरंगा हाती घेऊन रस्त्यावर आल्याचे सांगून देशाच्या प्रधानमंत्र्यांच्या संदेशानुसार १५ ऑगस्टपर्यंत देशाच्या प्रत्येक शहरात, गावात आपली राष्ट्रभक्ती प्रगट करण्याकरता तिरंगा झेंडा हातामध्ये घ्यावा आणि तिरंग्याची शान दाखवून द्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, तिरंगा हा केवळ झेंडा नसून देशभक्तीचे प्रतीक आहे. तिरंगा आपल्या मनात आणि जीवनात आहे. तिरंगा हाती घेतला तर आपल्याला केवळ आपले अधिकार नाही तर कर्तव्य देखील लक्षात ठेवावे लागतात. ज्या संविधानाने अधिकार दिले त्याच संविधानाने आपल्यावर काही कर्तव्ये पार पाडण्याची जबाबदारीदेखील टाकली आहेत. त्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचे काम आपल्याला करायचे आहे, असेही ते म्हणाले.

प्रधानमंत्री मोदींनी पाहिलेले विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी विकसित महाराष्ट्र उभा करायचा आहे. पुणे महाराष्ट्राची विद्यानगरी, महाराष्ट्राची नवोन्मेशाची नगरी तसेच महाराष्ट्राची उद्योग नगरी आहे. पुण्यनगरी भारताचं एक सांस्कृतिक बलस्थान आहे. या पुण्याच्या युवाशक्तीच्या भरोशावर उद्याचा भारत आपण पाहणार आहोत, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

तिरंग्याच्या सन्मानासाठी अनेकांनी आपले प्राण दिले, तिरंगा आणि देशासाठी अनेक सैनिक प्राण देतात. हा तिरंगा हाती घेतल्यावर आपल्यावर देशसेवेची जबाबदारी आहे, याचे स्मरण मुख्यमंत्र्यांनी उपस्थितांना करून दिले.

ललित चौक येथून रॅलीला प्रारंभ झाला आणि फर्ग्युसन महाविद्यालय मार्गाने पुढे जात छत्रपती संभाजी महाराज चौकात रालीचा समारोप झाला. यावेळी दुतर्फा उभे राहून नागरिक, विद्यार्थी वंदे मातरम्, भारत माता की जय आदी घोषणा दिल्या.

रॅलीत लोकप्रतिनिधी, नागरिक, महाविद्यालयीन, शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिंपरी-चिंचवाड दुर्गंधीच्या विळख्यात

## शहरभर कचऱ्याचे ढीग; एमआयडीसीत महिनाभरापासून कचरा साचला

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**८ जुलै रोजी मोशी कचरा डेपोतील कचऱ्याचा ढिगारा वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कोसळून झालेल्या दुर्घटनेत नऊ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर डेपोतील कचरा स्वीकारणे आणि प्रक्रिया करण्याची व्यवस्था प्रभावित झाली. काही दिवस डेपो बंद राहिल्याने शहरातील कचरा संकलन आणि वाहतुकीची साखळी विस्कळित झाली.**

कचरा टाकण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने अनेक ठिकाणी कचरा साचला आहे. पावसामुळे कचरा कुजत असल्याने दुर्गंधी पसरली असून, डास, माशा आणि उंदरांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

एमआयडीसीतील परिस्थितीही गंभीर आहे. कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने उद्योग परिसरात अस्वच्छता वाढली आहे. प्रशासनाने पर्यायी व्यवस्था करून साचलेला कचरा तातडीने उचलावा; अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा उद्योजकांनी दिला आहे.

कंपन्यांकडून नियमित कर आणि विविध शुल्क वसूल केले जात असताना कचरा संकलनासारखी मूलभूत सेवा मिळत नसल्याने उद्योजकांमध्ये नाराजी आहे. कंपन्यांच्या परिसरातील कचऱ्यामुळे लेखापरीक्षणात आक्षेप नोंदवले जाऊ शकतात. त्याचा परिणाम व्यवसायावर होण्याची शक्यता असल्याचे इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांनी सांगितले.

दरम्यान, मोशी डेपोवर पुन्हा कचरा टाकण्यास सुरुवात झाली आहे. मोकळ्या जागांवर साचलेला कचराही उचलण्यात येत असून, तो मोशी डेपोत नेला जात आहे. सर्व ठिकाणचा कचरा उचलण्याच्या कामाला गती देण्यात आली असल्याचे महापालिकेच्या आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

मोशी दुर्घटनेनंतर निर्माण झालेल्या कचराकोंडीमुळे महापालिकेच्या पर्यायी नियोजनावर प्रश्न उपस्थित झाले आहेत. शहराच्या वाढत्या कचऱ्याचा विचार करून विकेंद्रित कचरा प्रक्रिया प्रकल्प आणि सक्षम पर्यायी व्यवस्था उभारण्याची गरज अधोरेखित झाली आहे.





### दुर्गंधीमुळे रोगराईची भीती

पावसाच्या पाण्यामुळे कचरा कुजण्याची प्रक्रिया वेगाने होत असून, त्यातून दुर्गंधीयुक्त पाणी रस्ते, गटारे आणि आसपासच्या जमिनीत मिसळत आहे. कचऱ्याभोवती माशा, डास, उंदीर आणि अन्य कीटकांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

### 'एमआयडीसी'तील प्रश्न भीषण

गेल्या महिनाभरापासून औद्योगिक कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला आहे. वेळेवर कचरा उचलला जात नसल्यामुळे संपूर्ण औद्योगिक परिसरात दुर्गंधी, अस्वच्छता आणि रोगराईचा धोका वाढला आहे. प्रशासनाने पर्यायी यंत्रणा तत्काळ कार्यान्वित करून औद्योगिक कंपन्यांमध्ये महिनाभरापासून साचलेला कचरा युद्धपातळीवर उचलावा. अन्यथा, उद्योजकांकडून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा उद्योजकांनी दिला आहे.

# लोणावळ्यात ८.५ किलो गांजा जप्त; तरुणाला अटक...

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**गांजाची विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या २३ वर्षीय तरुणाला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने कुसगाव येथे ताब्यात घेतले. त्याच्याकडून ८ किलो ५०० ग्रॅम गांजा आणि कार असा एकूण ७ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

शुभम रमाकांत शर्मा (वय २३, रा. श्रमदान नगर, कुसगाव, ता. मावळ) असे ताब्यात घेतलेल्या संशयिताचे नाव आहे.

९ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पथक लोणावळा ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. त्यावेळी कुसगाव येथील आयआरबी कार्यालय परिसरात गांजाची विक्री होणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी परिसरात सापळा रचला.

संशयित शुभम शर्मा याला ताब्यात घेऊन त्याच्या कारची झडती घेतली असता ८ किलो ५०० ग्रॅम गांजा आढळून आला. जप्त केलेल्या गांजाची किंमत ४ लाख २५ हजार रुपये, तर कारची किंमत ३ लाख रुपये आहे. पोलिसांनी एकूण ७ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.



### ८.५ किलो गांजा जप्त

लोणावळा ग्रामीण हद्दीतील कुसगाव येथे गांजा विक्रीच्या तयारीत असलेल्या २३ वर्षीय तरुणाला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने ताब्यात घेतले. त्याच्याकडून ८ किलो ५०० ग्रॅम गांजा व कार असा ७ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शुभम रमाकांत शर्मा असे संशयिताचे नाव आहे.



## भूमिका

**नीट पेपरफुटीच्या प्रकरणात विद्यार्थ्यांना न्यायासाठी दिल्लीत 'जंतर-मंतर'वर तब्बल ३५ दिवस संघर्ष करावा लागला. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला राजकीय रंग देण्याचे प्रयत्न झाले, विविध प्रकारचे दबावतंत्र वापरले गेले; मात्र विद्यार्थी आपल्या मागण्यांवर ठाम राहिले आणि अखेरीस त्यांच्या आंदोलनाला यश मिळाले.**

# परीक्षा व्यवस्थेवरील विश्वासाचा प्रश्न ऐरणीवर

आता झारखंडमध्येही परीक्षांमधील गैरप्रकार आणि पेपरफुटीविरोधात विद्यार्थ्यांनी उभारलेले आंदोलन व्यवस्थेसाठी गंभीर इशारा ठरत आहे. झारखंड लोकसेवा आयोगाच्या मागील परीक्षांमधील कथित भ्रष्टाचार आणि गैरप्रकारांविरोधात विद्यार्थी गेल्या काही दिवसांपासून आंदोलन करत आहेत. भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, गैरप्रकारांची स्वतंत्र चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, या त्यांच्या प्रमुख मागण्या आहेत.

सरकारने सुरुवातीला या आंदोलनाकडे गांभीर्याने पाहिले नाही. उलट, आंदोलनाला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न झाल्याचे चित्र निर्माण झाले. मात्र दबाव वाढत गेल्यानंतर सरकारने झारखंड लोकसेवा आयोगाची १४ वी प्राथमिक परीक्षा रद्द करण्याचे आणि बॅकलॉगच्या परीक्षांमधील गैरप्रकारांची चौकशी करण्याचे आश्वासन दिले आहे.




मात्र विद्यार्थ्यांचा प्रश्न रास्त आहे. चौकशी करायची असेल तर ती सीबीआयमार्फतच का करू नये? राज्यातील यंत्रणांवर विश्वास नसल्याचे विद्यार्थी स्पष्टपणे सांगत असतील, तर त्यांच्या या अविश्वासाचे कारण समजून घेण्याची जबाबदारी सरकारची आहे. यापूर्वी भरती परीक्षा, निकाल आणि निवड प्रक्रियेबाबत अनेकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यामुळे केवळ चौकशीचे आश्वासन देऊन विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन होणार नाही.

स्टाफ सिलेक्शन कमिशनच्या परीक्षांबाबत सरकारचा युक्तिवाद तर अधिकच कमकुवत वाटतो. निवड झालेले उमेदवार सध्या नोकरीत आहेत, म्हणून परीक्षा रद्द करता येणार नाही, असे सांगितले जाते. परंतु परीक्षेत गैरप्रकार झाले असतील, तर त्याची पारदर्शक चौकशी करण्यास कोणताही अडथळा असू नये. गैरप्रकार सिद्ध झाल्यास दोषींवर कारवाई करण्याचा मार्ग काय, याचे उत्तरही सरकारने द्यायला हवे. या आंदोलनात राजकीय हस्तक्षेपाचा मुद्दाही महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना राजकीय पाठिंबा मिळणे आणि एखाद्या पक्षाने आंदोलनाचा ताबा घेणे, यात फरक आहे. तरुणांना आपला लढा स्वतःच्या बळावर लढायचा असेल, तर त्यांच्या भूमिकेचा आदर केला पाहिजे. त्यांच्या प्रश्नांना राजकीय चष्म्यातून पाहणे म्हणजे मूळ प्रश्नापासून लक्ष विचलित करणे होय.

देशातील तरुण वर्ग आता परीक्षा व्यवस्थेकडे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन म्हणून पाहत नाही; तो या व्यवस्थेत पारदर्शकता आणि विश्वासाची मागणी करत आहे. एका विद्यार्थ्याचे वर्ष, पैसा, श्रम आणि मानसिक ऊर्जा या परीक्षांशी जोडलेली असते. त्यामुळे पेपरफुटी, निकालातील अनियमितता किंवा भरती प्रक्रियेतील गैरप्रकार हे केवळ प्रशासकीय दोष नसून हजारो तरुणांच्या भवितव्याशी खेळ आहेत. व्यवस्थेने हे वास्तव स्वीकारण्याची वेळ आली आहे.

विद्यार्थ्यांच्या मागण्या योग्य असतील, तर त्या मान्य करण्यासाठी एवढा हट्टाग्रह कशासाठी? चौकशी निष्पक्ष असेल तर सीबीआयची मागणी स्वीकारण्यास हरकत का? दोषी नसतील तर तपासातून ते स्पष्ट होईल आणि दोषी असतील तर त्यांना शिक्षा होईल. दोन्ही परिस्थितीत व्यवस्थेचाच विश्वास वाढेल. झारखंडमधील आंदोलन हा केवळ एका राज्यातील परीक्षेचा प्रश्न नाही. तो देशभरातील परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा प्रश्न आहे. तरुण आता जागा झाला आहे. त्यामुळे गैरप्रकारांकडे दुर्लक्ष करून किंवा दोषींना संरक्षण देऊन हा आवाज दाबता येणार नाही. व्यवस्थेने हट्टाग्रह सोडून पारदर्शकतेचा मार्ग स्वीकारणे, हाच पुढील संघर्ष टाळण्याचा सर्वात योग्य मार्ग आहे.

## प्रासंगिक »

### सहाय्य

**एका गावात एक आंधळा आणि एक लंगडा भिकारी राहत होते. एके दिवशी दोघांची भेट झाली. गप्पा मारताना त्यांनी आपापल्या अडचणी एकमेकांना सांगितल्या. आंधळा म्हणाला, "मला काही दिसत नाही.**

त्यामुळे रस्ता ओळखता येत नाही. कधी कधी लोकही माझी फसवणूक करतात." लंगडा म्हणाला, "मला रस्ता नीट दिसतो; पण मला चालता येत नाही. त्यामुळे माझीही मोठी अडचण होते." दोघांनी विचार केला. प्रत्येकाकडे एक अशी क्षमता होती, जी दुसऱ्याकडे नव्हती. लंगड्याला रस्ता दिसत होता, तर आंधळ्याला चालता येत होते. लंगड्याने युक्ती सुचवली, "तू मला तुझ्या खांद्यावर बसव. मी तुला रस्ता, वळणे आणि अडथळे सांगत जाईन. तू मला घेऊन चाल.

अशा प्रकारे आपण दोघेही आपले काम करू शकतो." आंधळ्याला ही कल्पना आवडली. दुसऱ्या दिवसापासून दोघे एकत्र प्रवास करू लागले. लंगडा रस्ता दाखवायचा आणि आंधळा त्याला घेऊन चालायचा. वाटेत थकवा आला की दोघे विश्रांती घेत. एकमेकांना आधार देत त्यांनी आपले आयुष्य सुखकर केले.

- तात्पर्य : एकमेकांना सहकार्य केल्यास अडचणींवर सहज मात करता येते.

गावाच्या हद्दीत प्रवेश करण्याआधीच आजकाल गावाचे दर्शन घडते ते अवाढव्य फ्लेक्सच्या रूपाने. रस्त्याच्या कडेला, चौकात, शाळेसमोर, पाण्याच्या टाकीजवळ, एसटी स्थानकाच्या परिसरात आणि अगदी गावाच्या वेशीवरही असंख्य चेहरे झळकत असतात.

# फ्लेक्स वाढले, पण गावाचा विकास कुठे?

वाढदिवसाच्या शुभेच्छा, अभिनंदन, सत्कार, भूमिपूजन, उद्घाटन अशा निमित्तांनी उभारलेल्या या फ्लेक्सवर गावातील कार्यकर्त्यांची बारकीबारकी चेहरेमुद्रा दिसते. गावात आपले वजन वाढविण्यासाठी फ्लेक्सवर झळकणे हा नवा निकष ठरला आहे.

पूर्वी गावात वजन वाढवायचे असेल तर वर्षानुवर्षे गावासाठी काम करावे लागायचे. लोकांच्या अडचणी सोडवाव्या लागायच्या. श्रमदान करावे लागायचे. एखादा रस्ता बांधण्यासाठी, शाळेची दुरुस्ती करण्यासाठी किंवा पाण्याची व्यवस्था करण्यासाठी लोक एकत्र यायचे. काम महत्त्वाचे होते; काम करणाऱ्याचे नाव नव्हे. आज मात्र परिस्थिती उलटली आहे. काम किती झाले यापेक्षा त्याचे श्रेय कोणाच्या नावावर गेले, याला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

'विकास' हीदेखील आता प्रत्यक्ष जमिनीवर घडणारी प्रक्रिया न राहता फ्लेक्सवर दाखवण्याची गोष्ट बनत चालली आहे. एखादा छोटासा रस्ता झाला, नळयोजना सुरू झाली किंवा




गटाराची साफसफाई झाली की लगेच भूमिपूजन, उद्घाटन आणि अभिनंदनाचे फलक उभे राहतात. काही वेळा त्या फलकांवर होणारा खर्चच एखाद्या छोट्या सार्वजनिक कामासाठी पुरेसा ठरू शकतो. विकासाच्या कामापेक्षा त्याच्या जाहिरातीवर अधिक खर्च होणे, ही आपल्या सार्वजनिक जीवनातील विसंगती आहे. पूर्वी गावातील एखाद्या चांगल्या कामाची चार ओळींची बातमी वर्तमानपत्रात आली तरी संबंधितांना समाधान मिळायचे. आज मात्र त्या बातमीपेक्षा मोठा फ्लेक्स उभारणे आवश्यक वाटते. कामाच्या गुणवत्तेपेक्षा नाव किती मोठ्या अक्षरांत छापले आहे, यावर प्रतिष्ठा मोजली जाते. परिणामी सार्वजनिक कामे ही जनतेच्या गरजांपेक्षा वैयक्तिक राजकीय प्रतिमा उभारण्याचे साधन बनत आहेत.

निवडणुकीच्या काळात या फ्लेक्स संस्कृतीला आणखी उधाण येते. अचानक रस्त्यांवरील खड्डे बुजतात, गटारे स्वच्छ होतात, दिवे लागतात आणि त्याच्या जाहिरातींचे महाकाय फलक उभे राहतात. जणू वर्षभराचा विकास काही दिवसांतच घडून आला आहे, असा आभास निर्माण केला जातो. प्रश्न फ्लेक्सचा नाही; प्रश्न आहे तो मानसिकतेचा. सार्वजनिक काम हे जनतेच्या पैशातून आणि जनतेसाठी होते. त्यावर वैयक्तिक प्रसिद्धीचा हक्क सांगणे कितपत योग्य? गावाच्या विकासाची खरी ओळख भव्य फलकांनी नव्हे, तर स्वच्छ रस्ते, चांगली शाळा, पुरेसे पाणी, सक्षम आरोग्यव्यवस्था आणि टिकाऊ सुविधा यांनी झाली पाहिजे. फ्लेक्सवर नाव कोरण्याची उठवळ घाई कमी झाली आणि प्रत्यक्ष काम करण्याची घाई वाढली, तरच गावाचा खरा विकास दिसेल. नाहीतर फलक वाढत जातील आणि विकासाची उंची मात्र तिथेच राहील.

## ।। अभंगवाणी ।।



मज दास करी त्यांचा ।
संतदासांच्या दासांचा ॥१॥

मग होत कल्पवरी ।
सुखें गर्भवास हरी ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राक्षसांचं राज्य असल्यासारखं वाटतंय

## जमीन प्रकरणावरुन ज्येष्ठ अभिनेत्री उषा चव्हाण यांचा संताप

महाईन्यूज । मुंबई

**आपल्या अभिनयासोबतच आपल्या नृत्यानं मराठी रसिक-प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या प्रख्यात अभिनेत्री उषा चव्हाण या ऐंशीच्या दशकात रुपेरी पडदा गाजवणारं हे मराठमोळं नाव आजही दिग्गजांच्या यादीत आवर्जुन घेतलं जातं. पण, दिग्गज अभिनेत्री उषा चव्हाण एका जमिनीच्या प्रकरणामुळे चर्चेत आहेत. ज्येष्ठ अभिनेत्री उषा चव्हाण सध्या पुण्यातील त्यांच्या कौटुंबिक जमिनीच्या वादामुळे आणि टीडीआर हस्तांतरण प्रकरणामुळे हैराण झाल्या आहेत. राक्षसांचं राज्य आहे का असा संतप्त सवाल त्यांनी केला आहे.**



मी उषा चव्हाण बोलते आहे. तुम्हाला वाटत असेल की इतके दिवस या कुठे गायब होत्या. आज तीन महिने आणि सात दिवस होतील. मी माझा जीवन गौरव पुरस्कार हा आनंद दिघे यांच्या आश्रमात ठेवून आले आहे. त्यावेळी, माननीय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मला आश्वासन दिलं होतं. कायदेशीर बाबी सांगितल्या, सगळं ऐकून घेतलं. त्यानंतर ते म्हणाले तुमचं काम मी करणार. यात काही नवीन नाही. परंतु त्यांना मला माहीत आहे की याची कल्पना नाही. पण त्यांचे लोक मला आणि माझ्या मुलाला त्रास देत आहेत. एक पत्र पाठवलं आहे मुख्यमंत्री ऑफिसमधून त्यात वाट्टेल ते लिहिलं आहे. ज्या टीडीआरसाठी मी उपोषणाला बसले होते. माझ्या विरोधातले लोक मंत्रालयात उपद्व्याप करत होते. मी ज्या करता कष्ट केले ती गोष्ट परप्रांतीयांना देऊन टाकता? माझ्या मुलाचा हक्क असताना हे करता येतं? हे करुन त्यांना काय मिळतं असा प्रश्न उषा चव्हाण यांनी उपस्थित केला.

आमचा टीडीआर लोकांना देण्याचा अधिकार कसा काय? दोन्ही पार्टी एकत्र बसा आणि निर्णय घ्या असं म्हटलं आहे कोर्टाने. तरीही पुणे महापालिकेकडून सक्ती केली जाते. कशाला आमची हाय घेता आहात? आम्हाला वारंवार त्रास दिला जातो आहे. कुत्र्याचं शेपूट वाकडं ते वाकडंच. हे सगळं पाहूनच मी एकनाथ शिंदेंना भेटायला गेले होते. त्यांनी मला आश्वासन दिलं होतं. पण आता मुख्यमंत्री कार्यालयाकडून जे पत्र आलंय त्यात परत काहीतरी उपद्व्यापच सांगितले आहेत. काहीही वाट्टेल ते लिहिलं आहे. तुम्हाला कळणारच नाही की नेमकं काय करायचं आहे. आम्ही काय करायचं आहे? आयुष्यभर आम्ही हेच करायचं का माझं वय ७९ आहे. दहीहंडीच्या दिवशी मी ऐंशी वर्षांची होईन कशाला माझी हाय घेत आहात. सध्या राक्षसांचं राज्य आहे असं वाटतं आहे. मराठी माणसाला जगवायचं नाही का? परप्रांतीयांना आमच्या कष्टाचं का देत आहात? आमची गोष्ट लोकांना द्यायचा अधिकार तुम्हाला कुणी दिला? तुम्ही तुमचं पत्र वाचा. त्यात कळेल की तुमची भाषा कशी आहे. मधे त्यांचे एक पीए आहेत त्यांचा फोन आला होता. दहा दिवसांच्या आत मिटिंग होईल सांगितलं, पण नंतर काहीच घडलं नाही.

### आमच्या डोक्याला ताप झाला आहे- उषा चव्हाण

मंगेश देसाई यांनाही आम्ही संपर्क केला. डोक्याला ताप आम्हालाही कुणाला द्यायचा नाही. आमच्या हक्काच्या गोष्टी आहेत त्यामुळे आम्ही बोलतो आहोत. माझ्या चाहत्यांना समजलं पाहिजे की नेमकं काय चाललं आहे म्हणून हा व्हिडीओ मी करते आहे. आमची सर्टिफिकेट आम्हाला द्या. झोपेतून जागे व्हा जरा जे गुन्हेगार आहेत ते. ज्यांनी मला पत्र पाठवलं आहे ना ते पुन्हा वाचा. बेकायदेशीर गोष्टी असत्या तर मी पुढे गेलेच नसते. सध्या मोगलाई चालली आहे का? परप्रांतीयांच्या हातात सगळ्या गोष्टी द्यायच्या आणि मराठी माणसाला झोपवायचं. प ण असं काही मी करणार नाही असंही उषा चव्हाण यांनी म्हटलं आहे.

# पुणे-बंगळुरु महामार्गावर शिरवळजवळ भीषण अपघात

महाईन्यूज । मुंबई

**सातारा-पुणे-बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावर शिरवळ येथे मध्यरात्री सव्वाएकच्या सुमारास झालेल्या एका अंत्यंत भीषण अपघातात चार तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. मोटारीवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला.**



मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याहून साताऱ्याच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या मोटारी(MH १४ एल जे३०३३ ) वरील चालकाचे अचानक नियंत्रण सुटले. नियंत्रण सुटलेली मोटार मध्यभागी असलेल्या डिव्हायडरला जोरदार धडकून पलटी झाली आणि उडून विरुद्ध दिशेच्या मार्गीकेमध्ये जाऊन समोरून येणाऱ्या ट्रकला(KA २७ सी ५८७८) धडकली. ही धडक एवढी भीषण होती की, मोटारीचा चक्काचूर झाला.

या भीषण अपघातात मावळ व कामशेत परिसरातील वेदांत अर्जुन वारिंगे, सोनलिंग धीरेंद्र ठाकूर, आदित्य बाळासाहेब गरुड आणि तळेगाव दाभाडे येथील निखिल बाळू राऊत या चार तरुणांचा जागीच मृत्यू झाला. तर दीक्षित दयानंद पुजारी आणि मयूर हनुमंत शिंदे हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती मिळताच सारोळा महामार्ग पोलीस मदत केंद्राच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त वाहने महामार्गावरून बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. अपघाताची माहिती मिळताच अपघात असताना मदतीसाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थ जमा झाले होते.या घटनेमुळे मावळ आणि तळेगाव परिसरात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी शिरवळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची आणि पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.

या घटनेची नोंद शिरवळ पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कारचा ताबा नेमका कोणत्या कारणामुळे सुटला, वाहनाचा वेग किती होता, चालकाचे नियंत्रण का गेले आणि अपघातामागे अन्य काही कारण होते का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

मध्यरात्रीच्या वेळी पुणे-सातारा महामार्गावर झालेल्या या भीषण अपघाताने मावळ आणि तळेगाव दाभाडे परिसरावर शोककळा पसरली आहे. चार तरुणांचा एकाच दुर्घटनेत मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी

अपघातामुळे पुणे-सातारा महामार्गावरील वाहतुकीवरही काही काळ परिणाम झाला. अपघातग्रस्त कार आणि ट्रक रस्त्यावर असल्याने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. अपघाताची माहिती मिळताच सारोळा महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. क्रेनच्या मदतीने अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला करण्यात आली. त्यानंतर महामार्गावरील वाहतूक हळूहळू सुरळीत करण्यात आली.

# कोलंबियात भूकंपाचा हाहाकार!

## १३२ लोकांचा मृत्यू, अनेकजण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती

**महाईन्यूज । कोलंबिया**

**सोमवारी सकाळी पश्चिम कोलंबियामध्ये झालेल्या शक्तिशाली भूकंपात किमान १३२ लोकांचा मृत्यू झाला असून, कोसळलेल्या इमारतींखाली बरेच लोक अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. गेल्या अनेक वर्षांतील देशातील सर्वात शक्तिशाली हा भूकंप आहे, असे येथील अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच राष्ट्राध्यक्ष अबेलार्डो दे ला एस्प्रीएला यांनी या भूकंपानंतर राष्ट्रीय आपत्ती जाहीर केली आहे.**



कोलंबियात सोमवारी ७.४ तीव्रतेच्या शक्तिशाली भूकंप झाला आहे. कोलंबियाच्या पॅसिफिक किनाऱ्यावरील चोको प्रांतातील सान जोस देल पाल्मार जवळ भूकंपाचा केंद्रबिंदू होता. कोलंबियाच्या भूवैज्ञानिक सेवेनुसार, हा भूकंप स्थानिक वेळेनुसार सकाळी ७:३४ वाजता १०३ किमी खोलीवर झाला. त्यानंतर २.८ आणि ४.८ रिश्टर स्केलचे दोन लहान धक्के बसले. या भूकंपाचे धक्के राजधानीसह प्रमुख शहरांमध्ये तसेच शेजारील इक्वाडोरमध्येही जाणवले.

शेजारील व्हेनेझुएलामध्ये याप्रमाणेच झालेल्या भीषण भूकंपात ६,००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता, त्यानंतर ही दुर्घटना घडली आहे. नुकतेच पदभार स्वीकारलेले राष्ट्राध्यक्ष अबेलादो दे ला एस्प्रिएला यांच्यासमोर या नैसर्गिक आपत्तीच्या रूपाने पहिले मोठे संकट उभे ठाकले आहे. इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, रिसालदामध्ये सर्वाधिक मृत्यू झाल्याचे वृत्त असून, ४२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती गव्हर्नर हुआन दिएगो पातिणो यांनी दिली. परेरा येथे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून भागात अनेक इमारती कोसळल्या आहेत.

कोलंबियातील सर्वात मोठ्या शहरांपैकी एक असलेल्या कलीमध्ये या भूकंपाने मोठ्या प्रमाणावर नुकसान केले आहे. कलीचे महापौर अलेजांद्रो एडर यांनी २५ इमारती कोसळल्याची आणि नागरिक अद्याप ढिगाऱ्याखाली अडकल्याची माहिती दिलीय. बचावकार्यात मदत करण्यासाठी पालिकेने बोगोटा आणि मेदेलिन येथून आपत्ती प्रतिसाद पथके मागवली आहेत.

"आतापर्यंत दोन जणांना जिवंत बाहेर काढण्यात आले आहे, ज्यात एक वृद्ध महिला आणि एका लहान मुलीचा समावेश आहे. अजूनही काही लोक अडकले आहेत," असे एडर यांनी 'ब्ल्यू रेडिओ'ला सांगितले. शहरातील अनेक संवेदनशील ठिकाणी आपत्कालीन पथके कारवाई करत आहेत. चोको प्रांतातील सान जोस देल पाल्मारजवळ भूकंपाचा केंद्रबिंदू होता.

### बचाव आणि पाहणी पथकांचे काम सुरू

चोको प्रांतात जीवितहानी झाल्याचे आणि मोठे नुकसान झाल्याचे प्रशासनाने म्हटले आहे, भूकंप प्रभावित भागात बचाव आणि पाहणी पथकांचे काम सुरूच आहे. नागरिकांना भूकंपाचे धक्के पुन्हा बसण्याची शक्यता लक्षात घेऊन सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गेल्या दशकात देशात झालेला हा सर्वात शक्तिशाली भूकंप असल्याचे कोलंबियन जिऑलॉजिकल सर्व्हिसने म्हटले आहे.

# झारखंड विद्यार्थी आंदोलनाला CJP च्या अभिजीत दिपकेंचा पाठिंबा

**महाईन्यूज । झारखंड**

**झारखंड लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत झालेल्या कथित गैरव्यवहाराविरोधात रांचीमध्ये पेटलेल्या विद्यार्थी आंदोलनाचे लोण आता थेट दिल्लीतील संसदेपर्यंत पोहोचले आहे. गेल्या काही दिवसांपासून अन्नत्याग आंदोलन करणारे विद्यार्थी नेते देवेंद्र नाथ महातो यांच्या समर्थनार्थ प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.**





'कॉक्रोच जनता पार्टी'चे (CJP) संस्थापक अभिजीत दिपके यांनी मंगळवारी देवेंद्र महातो यांच्याशी फोनवरून संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली आणि त्यांच्या संघर्षाचे कौतुक केले.

अन्नत्याग आंदोलनामुळे देवेंद्र महातो यांची प्रकृती खालावली असून, सोमवारी विधानसभेकडे मोर्चा नेण्यापूर्वी पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्यात ते जखमी झाले होते. सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

झारखंडमधील आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसांच्या बळप्रयोगावरून मंगळवारी संसदेच्या आवारात प्रचंड राजकीय गदारोळ पाहायला मिळाला. संसदेच्या मुख्य 'मकर द्वारा'वर सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA) आणि विरोधी 'इंडिया' आघाडीचे खासदार आमनेसामने आले.

दोन्ही बाजूंनी हातात फलक घेऊन एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. परिस्थिती चिघळू नये म्हणून तेथे तैनात सुरक्षारक्षकांनी दोन्ही बाजूंच्या खासदारांमध्ये मानवी साखळी तयार केली.

रालोआच्या खासदारांनी संसद ग्रंथालयाकडून मकर द्वाराकडे मोर्चा काढत काँग्रेस आणि झारखंडमधील सत्ताधारी जेएमएम-काँग्रेस आघाडी सरकारविरोधात निदर्शने केली. भारतीय जनता पक्षाचे खासदार निशिकंत दुबे यांनी आरोप केला की, "काँग्रेस नेते राहुल गांधी देशातील विद्यार्थ्यांच्या मुद्द्यावरून आणि चर्चेपासून पळ काढत आहेत." तर भाजप खासदार कंगना रणौत यांनी झारखंड सरकारवर हल्लाबोल करत म्हटले, "झारखंडमध्ये निष्पाप विद्यार्थ्यांवर अतोनात अत्याचार केले जात आहेत. त्यांच्यावर पाण्याचे फवारे मारले गेले, अश्रूधूर सोडण्यात आला आणि क्रूरपणे लाठीचार्ज करण्यात आला. या दडपशाहीचे उत्तर सत्ताधाऱ्यांना द्यावेच लागेल."

दुसरीकडे, विरोधकांनी केंद्र सरकार आणि पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी वाड्रा आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यासह विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसदेच्या आवारात निदर्शने केली. विरोधी पक्षांनी जुलै महिन्यात दिल्लीत नीट पेपरफुटीविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस कारवाईचा आणि झारखंडमधील लाठीहल्ल्याचा तीव्र निषेध केला. "आंदोलक विद्यार्थ्यांवर पेलेट गन आणि लाठीचार्ज करण्याचे आदेश कोणी दिले, याचे उत्तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत दिले पाहिजे," अशी आक्रमक भूमिका विरोधकांनी घेतली.

> "देवेंद्रभाई, तुमच्या धैर्याला आणि जिद्दीला आमचा सलाम! तुम्ही झारखंडच्या तरुण पिढीचा बुलंद आवाज आणि प्रेरणा आहात. या लढ्यात आम्ही पूर्ण ताकदीने तुमच्या पाठीशी उभे आहोत. देशातील तरुणांना तुमच्यासारख्या लढवय्या नेतृत्वाची गरज आहे.
>
> - अभिजीत दिपके, संस्थापक, CJP.



# ‘तक्षाकुडू’मध्ये नितांशी

चित्रपट ‘लापता लेडीज’ फेम नितांशी गोयल स्वत:चा आगामी चित्रपट ‘तक्षाकुडू’वरून चर्चेत आहे. तिने सोशल मीडियावर या चित्रपटाचे चित्रिकरण पूर्ण झाल्याची माहिती दिली आहे. तसेच सेटवरील अनेक छायाचित्रे तिने शेअर केली आहेत. या छायाचित्रांमध्ये नितांशी हे वधूच्या वेषात दिसून येते, तर दुसऱ्या छायाचित्रात ती एका श्वानाला गोंजारत असल्याचे नजरेस पडते. तक्षकुडूच्या चित्रिकरणाचा प्रवास अत्यंत चांगला राहिला. सेटवर प्रत्येक दिनी मी नवे काही तरी शिकू शकले आहे. अनेक आठवणी निर्माण करता आल्या. चित्रपटातील स्वत:ची भूमिका कधीच विसरू शकणार नसल्याचे नितांशीने कॅप्शनदाखल म्हटले आहे. नितांशीचा हा आगामी चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. नितांशी यात ‘करुणा’ नावाच्या एका युवतीची भूमिका साकारत आहे. यात तिच्यासोबत आनंद देवरकोंडा मुख्य भूमिकेत आहे. तर विनोट अनंतोजु यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. नितांशी ही 2024 मध्ये प्रदर्शित चित्रपट ‘लापता लेडीज’मध्ये दिसून आली होती. यात तिने फूल कुमारी ही भूमिका साकारली होती, ज्याचे प्रचंड कौतुक झाले होते.



# नवाजुद्दीन सोबत दिसणार सोनम

नवाजुद्दीन सिद्दीकी हा भारतीय चित्रपटसृष्टीतील दमदार कलाकार आहे, त्याने स्वत:च्या वैविध्यपूर्ण भूमिकांद्वारे वेगळी ओळख निर्माण केली आहे. परंतु आता नवाजुद्दीन हा पंजाबी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवणार आहे. या चित्रपटात त्याच्यासोबत अभिनेत्री सोनम बाजवा मुख्य भूमिकेत असणार आहे. सोनमला पंजाबी चित्रपटसृष्टीतील कॅटरीना कैफ या नावाने ओळखले जाते. सोनमने पंजाबी चित्रपटसृष्टीसोबत बॉलिवूडमध्येही स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. यापूर्वी तिने अनेक हिंदी चित्रपटांमध्ये दिग्गज कलाकारांसोबत काम केले आहे. आता तिला नवाजुद्दीनसोबत काम करण्याची संधी मिळाली आहे. सोनमने 2013 साली पंजाबी चित्रपट ‘बेस्ट ऑफ लक’द्वारे कारकीर्दीला प्रारंभ केला होता. त्यानंतर ‘सरदारजी 2’, ‘सुपर सिंह’ यासारख्या अनेक चित्रपटांमध्ये तिने काम केले आहे. तर नवाजुद्दीन हा यापूर्वी ‘मैं ॲक्टर नहीं हूं’ या चित्रपटात दिसून आला होता.



# जॉनी डेप करणार पुनरागमन

हॉलिवूडचा दिग्गज अभिनेता जॉनी डेपला मागील 8 वर्षांपासून मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी चाहते प्रतीक्षा करत होते. आता अखेर अभिनेता पुनरागमनासाठी सज्ज आहे. तो एका वेगळ्या शैलीत परतणार असून त्याच्या आगामी चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. ‘एबेनेजर’ हा त्याचा आगामी चित्रपट एक ख्रिसमस कॅरोल आहे. हा एक ख्रिसमस फँटेसी हॉरर थ्रिलर असून त्याचे दिग्दर्शन टी. वेस्टने केले आहे.

चित्रपटात जॉनी डेपसोबत एंड्रिया राइजबोरो, सॅम क्लॅफिन, डेजी रिडले, आर्थर केंटी, एली बॅम्बर, चार्ली मर्फी आणि इयान मॅक्केलन हे कलाकार आहेत. चित्रपटातील सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यात 63 वर्षीय जॉनीचा लुक आहे. हा लुक पाहून पहिल्या नजरेत त्याला ओळखणे कठिण आहे.

हा चित्रपट चार्ल्स डिकेंस यांच्या ‘अ ख्रिसमस कॅरोल’वरा आधारित असून यात एक कठोर आणि कंजूष व्यक्ती एबेनेजर स्क्रूजची कहाणी मांडण्यात आली आहे.एबेनेजरला ख्रिसमसच्या भेटवस्तूंबद्दल तिरस्कार आहे. ख्रिसमसच्या पूर्वसंध्येला त्याचा मृत्युमुखी पडलेला बिझनेस पार्टनर जॅकब मार्लेचे भूत अन् तीन आत्मे येतात आणि त्याला त्याचा भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य दाखवितात. भूत आणि आत्मा मिळून कशाप्रकारे त्याला बदलतात यावरच याची कहाणी बेतलेली आहे.

# क्रिकेटर अभिषेक पोरेलला अटक

## लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचाराचा आरोप; मोगरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**दिल्ली कॅपिटल्सचा यष्टीरक्षक-फलंदाज अभिषेक पोरेलच्या अडचणी वाढल्या आहेत. लग्नाचे आश्वासन देऊन लैंगिक संबंध ठेवल्याच्या आरोपावरून हुगळी पोलिसांनी मंगळवारी सकाळी पोरेलला ताब्यात घेतले. अनेक तास चौकशी केल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली. या प्रकरणात एका वैद्यकीय विद्यार्थिनीने तक्रार दाखल केली असून, तिच्या तक्रारीच्या आधारे मोगरा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.**




अटक केल्यानंतर पोरेलची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर त्याला चिन्सुराह न्यायालयात हजर करण्यात आले. या प्रकरणात मंगळवारीच जामिनासंदर्भातील सुनावणी होणार होती. पण यापूर्वीच कलकत्ता उच्च न्यायालयाने पोलिसांना पोरेलला अटक करण्याचे निर्देश दिले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, हुगळीतील मोगरा पोलिस ठाण्यात एका वैद्यकीय विद्यार्थिनीने पोरेलविरोधात तक्रार दाखल केली. तक्रारीत तिने आरोप केला आहे की, पोरेलने तिच्याशी लग्न करण्याचे आश्वासन देऊन तिच्याशी लैंगिक संबंध ठेवले. तिने पुढे असा दावा केला आहे की, दोघांमधील काही खासगी क्षण पोरेलने रेकॉर्ड केले होते.

तक्रारदार विद्यार्थिनीच्या म्हणण्यानुसार, दोन्ही कुटुंबांमध्ये लग्नाबाबत चर्चाही झाली होती. मात्र, त्यानंतर पोरेलचे इतर महिलांशी कथित संबंध असल्याची माहिती तिला मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यानंतर तिने पोलिसांकडे तक्रार करण्याचा निर्णय घेतला.

या प्रकरणातील आरोप सध्या तक्रार आणि FIRमध्ये नमूद केलेल्या दाव्यांवर आधारित आहेत. या आरोपांची सत्यता न्यायालयीन प्रक्रियेत तपासली जाणार आहे.

या प्रकरणाच्या FIRमध्ये एकूण 19 कलमांचा उल्लेख असल्याचे समोर आले आहे. FIRनुसार, कथित घटना 2 एप्रिल 2026 रोजी दिल्लीत घडल्याचा दावा तक्रारदार महिलेने केला आहे.

तक्रारीत पोरेलने तिला कथितरित्या एका ठिकाणी जाण्यापासून रोखले आणि तिला पुरेसे जेवणही दिले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच तिला जाणीवपूर्वक इतरांपासून दूर ठेवण्यात आल्याने तिची शारीरिक स्थिती बिघडली आणि चालण्यासही अडचण निर्माण झाल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. या सर्व दाव्यांची पोलिसांकडून चौकशी सुरू असून, आरोपांबाबत अंतिम निष्कर्ष न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होणार आहे. या प्रकरणात कलकत्ता उच्च न्यायालयाने पोरेलच्या अटकेचे निर्देश देण्यासोबतच तक्रारदार महिलेच्या फोटोंचा किंवा संबंधित व्हिडिओंचा प्रसार होऊ नये, यासाठीही सूचना दिल्या आहेत.

तसेच पोलिसांना पोरेलची इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपकरणांमध्ये या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती किंवा डिजिटल पुरावे आहेत का, याचा तपास पोलिसांकडून केला जाण्याची शक्यता आहे.

मंगळवारी पोलिसांनी पोरेलला ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यानंतर अटकेची औपचारिक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. वैद्यकीय तपासणीनंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. देशांतर्गत क्रिकेटमध्येही त्याची कामगिरी उल्लेखनीय आहे. 32 फर्स्ट क्लास सामन्यांमध्ये त्याने 1,408 धावा केल्या असून त्यात एका शतकाचा समावेश आहे. 23 लिस्ट ए सामन्यांमध्ये त्याच्या नावावर 833 धावा असून त्यात दोन शतकांचा समावेश आहे. टी-20 क्रिकेटमध्ये त्याने 61 सामन्यांत 1,590 धावा केल्या आहेत.

### अभिषेक पोरेलची क्रिकेट कारकीर्द

अभिषेक पोरेल हा बंगालकडून देशांतर्गत क्रिकेट खेळणारा यष्टीरक्षक-फलंदाज आहे. इंडियन प्रीमियर लीगमध्ये तो दिल्ली कॅपिटल्सकडून खेळतो. 2023 मध्ये ऋषभ पंतच्या अनुपस्थितीत त्याला दिल्ली कॅपिटल्सच्या संघात संधी मिळाली होती. IPLमध्ये दिल्ली कॅपिटल्सकडून 35 सामने खेळताना पोरेलने 769 धावा केल्या आहेत. त्याचा स्ट्राइक रेट 145 पेक्षा जास्त आहे. 2026च्या हंगामासाठी दिल्ली कॅपिटल्सने त्याला 4 कोटी रुपयांत रिटेन केल्याचे सांगितले जाते. देशांतर्गत क्रिकेटमध्येही त्याची कामगिरी उल्लेखनीय आहे. 32 फर्स्ट क्लास सामन्यांमध्ये त्याने 1,408 धावा केल्या असून त्यात एका शतकाचा समावेश आहे.

# भारताचे माजी कर्णधार सौरव गांगुली यांना जीवे मारण्याची धमकी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारताचा माजी कर्णधार आणि बीसीसीआयचा माजी अध्यक्ष सौरव गांगुलीला अनेक दिवसांपासून जिवे मारण्याची धमकी येत आहे. गेल्या काही महिन्यापासून हा प्रकार सुरू आहे. त्याला आलेल्या पत्रात सौरव गांगुली आणि त्याची पत्नी डोना गांगुली यांना मारण्याची धमकी देण्यात आली आहे.**



सौरव गांगुली हा सध्या बंगाल क्रिकेट असोसिएशनचा अध्यक्ष आहे. त्याने दक्षिण कोलकाताच्या ठाकूरपुकूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. यावेळी त्याने त्याला आलेल्या दोन धमकीचे पत्र पोलिसांना दिली आहेत.

सौरव गांगुलीला सहा महिन्यापूर्वी धमकीचे पत्र दिले होते. पोलिसांकडे केलेल्या तक्रारीत सौरव गांगुलीच्या मॅनेजरने एक पत्र सहा महिन्यापूर्वी आलं असल्याचं सांगितलं. सुरूवातीला आम्ही या धमकीच्या पत्राकडे फार गांभीर्याने पाहिलं नाही.

या प्रकरणी सोमवारी दक्षिण कोलकात्यातील ठाकूरपुकुर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांनी तातडीने तपासाला सुरुवात केली आहे. गांगुली यांच्या सचिवांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरुवातीला या प्रकरणाला फारसे गांभीर्याने घेतले गेले नव्हते.

सौरव गांगुली यांना वैयक्तिक रागातून किंवा द्वेषापोटी त्रास देण्याच्या उद्देशाने एखाद्या व्यक्तीने हे कृत्य केले असावे, असा प्राथमिक अंदाज होता. मात्र, धमकीच्या पत्रांचा ओघ सातत्याने सुरू राहिल्याने आणि त्यात कुटुंबातील सदस्यांचाही समावेश केल्याने सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांची मदत घेण्याचा निर्णय घेण्यात आला. मिळालेल्या धमकीच्या पत्रांमध्ये एका फोन नंबरचा आणि पत्त्याचाही उल्लेख करण्यात आला आहे. पोलिसांनी या नंबरची प्राथमिक पडताळणी केली असता, ट्रूकॉलरवर हा नंबर अरुण नावाच्या व्यक्तीचा असल्याचे दिसून आले.

### पत्नीसह जवळच्या व्यक्तींनाही धोका

मात्र ज्यावेळी सोमवारी दुसरं पत्र ऑफिसमध्ये आलं त्यावेळी सौरव गांगुली आणि त्यांच्या पत्नीला ठार मारण्याची धमकी देण्यात आले. त्यानंतर पोलिसांकडे धाव घेण्यात आली. दरम्यान, पोलिसांनी आता तपास सुरू केला असून हे पत्र कोणी पाठवलं आहे आणि त्याचा यामागचा ताय उद्देश आहे याचा तपास करत आहेत. पोलिसांनी सांगितलं की, 'आम्ही ही तक्रार गांभिर्याने घेतली असून आम्ही तपास सुरू केला आहे. आम्ही पत्राची तपासणी करत आहोत. त्याचा सोर्स, कुरिअरचा मागोवा घेत आहोत. आम्ही पत्र पाठवणाऱ्या व्यक्तीचा शोध घेत आहोत.'

स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज ™
ePaper
। बुधवार ।
दि. 12 ऑगस्ट 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# मोकाट श्वानांचा 'आतंक'; १३ हजारांवर चावे

## शहरात सुमारे एक लाख भटक्या श्वान; नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील मोकाट श्वानांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, चालू आर्थिक वर्षातील अवघ्या चार महिन्यांत तब्बल १३ हजार ६१५ नागरिकांना श्वानांनी चावा घेतला आहे. शहरात सुमारे एक लाख भटक्या श्वान असल्याचा प्रशासनाचा अंदाज आहे.**



कचराकुंड्या आणि उघड्यावर शिल्लक अन्न टाकले जात असल्याने मोकाट श्वानांची संख्या वाढत आहे. रात्रीच्या वेळी वाहनचालक आणि पादचाऱ्यांच्या अंगावर श्वान धावून येत असल्याने अपघातांच्याही घटना घडतात. लहान मुलांवर हल्ल्यांचे प्रकार वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

मागील ११ वर्षांत शहरात १ लाख ९८ हजार ३४५ नागरिकांना श्वानांनी चावा घेतला आहे. २०२५-२६ मध्ये सर्वाधिक ३८ हजार ४०४ नागरिकांना श्वानदंश झाला. मोकाट श्वानांवर नियंत्रणासाठी महापालिकेकडून नसबंदी शस्त्रक्रिया केली जात असली, तरी श्वानांची संख्या कमी होत नसल्याचे चित्र आहे.

नेहरूनगर येथील श्वान नसबंदी केंद्रावर पिंजऱ्यांची संख्या वाढविण्यासह पशुवैद्यकीय विभागाचे मनुष्यबळ वाढविण्यात येणार आहे. श्वान पकडण्याच्या कारवाईलाही गती देण्यात येत असल्याचे उपायुक्त संदीप खोत यांनी सांगितले.

दरम्यान, श्वानदंश झालेल्या नागरिकांना वायसीएम रुग्णालयात रेबीज प्रतिबंधक लस मोफत दिली जाते. रुग्णालयात लसीचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.

**Nutan Maharashtra Vidya Prasarak Mandal's (NMVPM's)**

**Nutan Maharashtra Institute of Engineering & Technology (NMIET)**

An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University,
Approved by AICTE, DTE, Maharashtra.
Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Tal Maval, Dist Pune 410507.

**"ADMISSION NOTICE FOR MBA DIRECT SECOND YEAR (LATERAL ENTRY) ACADEMIC YEAR 2026-27 (DTE CODE – 6310)"**

Admission are open to the MBA Direct Second Year (Lateral Entry) Programme for the Academic Year 2026-27 in accordance with the provisions of the Maharashtra CET Cell Information Brochure – 2026-27.

Total Vacancy for the Direct Second Year MBA (Lateral Entry) : 38 Seats

For applications Form the further details visit to www.nmiet.edu.in
Contact No : 8830992988/ 7423080910/ 9028101155

# पायाभूत विकासामुळे हिंजवडीला नवी गती

## हिंजवडी : आयटी उद्योगामुळे सातत्याने मजबूत होत असलेली बाजारपेठ

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुण्यातील रिअल इस्टेट क्षेत्र नव्या वाढीच्या टप्प्यात प्रवेश करत असून या बदलामागे वेगाने विकसित होत असलेली पायाभूत सुविधा, विस्तारत जाणारी व्यावसायिक केंद्रे आणि वाढती निवासी मागणी ही प्रमुख कारणे आहेत. केवळ पायाभूत सुविधांचा विचार केल्यास,लवकरच सुरू होणारी हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो मार्गिका ,प्रगतिपथावर असलेले पुणे रिंग रोडचे काम, मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील नवीन बायपास तसेच बंगळुरूकडे जाणारा ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्ग अशा विविध प्रकल्पामुळे बांधकाम क्षेत्रात एक आशादायी चित्र तयार झाले आहे.**



मेट्रो लाईन ३ पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर हिंजवडी आणि शहराच्या मध्यवर्ती भागातील प्रवास अधिक जलद व सोयीस्कर होईल. याचा लाभ केवळ बाणेर, बालेवाडी, वाकड आणि ताथवडे यांसारख्या विकसित भागांनाच नव्हे, तर मान आणि पुनावळे यांसारख्या उदयोन्मुख भागांनाही होण्याची अपेक्षा आहे. तज्ज्ञांच्या मते, या सुधारित कनेक्टिव्हिटीमुळे पश्चिम पुण्यात अधिक संतुलित शहरी विकासाला चालना मिळेल.

ANAROCK Research च्या माहितीनुसार, २०२५ मध्ये भारतातील सात प्रमुख शहरांमध्ये ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स (GCCs) यांनी ३२.४६ दशलक्ष चौरस फूट कार्यालयीन जागा भाडेतत्त्वावर घेतली. त्यापैकी सुमारे १५ टक्के म्हणजेच ४.८ दशलक्ष चौरस फूट व्यवहार पुण्यात झाले. त्यामुळे पश्चिम पुण्यात कार्यालयीन तसेच निवासी मालमत्तेची मागणी अधिक बळकट होत असल्याचे दिसून येते.

गेल्या दशकभरात हिंजवडी आयटी हबने पश्चिम पुण्यातील निवासी विकासाला दिशा दिली आहे. बाणेर, बालेवाडी, वाकड आणि ताथवडे यांसारखे भाग विकसित झाल्यानंतर, रोजगारकेंद्रांशी उत्तम संपर्क राखणाऱ्या आणि मोठ्या भूखंडांची उपलब्धता असलेल्या शेजारील भागांकडे विकासकांचा कल वाढला आहे.

VTP Realty नेही पश्चिम पुण्यातील पायाभूत सुविधा विकासाशी सुसंगत अशी विस्तार रणनीती स्वीकारली आहे. हिंजवडी परिसरातील उच्च-वाढीच्या कॉरिडॉरमध्ये एकात्मिक निवासी प्रकल्प विकसित करून कंपनीने रोजगारकेंद्रे, सुधारलेली कनेक्टिव्हिटी आणि विकसित होत असलेल्या सामाजिक सुविधांचा लाभ घेण्यावर भर दिला आहे. उद्योग क्षेत्राच्या मते, मेट्रो आणि रस्ते जाळे अधिक सक्षम होत असताना या भागांमध्ये मजबूत उपस्थिती असलेल्या संघटित विकासकांना सातत्यपूर्ण निवासी मागणीचा फायदा होण्याची शक्यता आहे.

"मेट्रो लाईन ३ हा पश्चिम पुण्याच्या रिअल इस्टेट विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. हिंजवडी आणि शहराच्या मध्यवर्ती भागातील संपर्क अधिक सक्षम झाल्यामुळे प्रवासाचा वेळ कमी होईल, दैनंदिन प्रवाशांची सोय वाढेल आणि परिसराच्या राहणीमानात सकारात्मक बदल घडेल. बाणेर आणि बालेवाडीसारख्या भागांतील वाहतूक कोंडी कमी करण्यासही या मार्गिकेची मदत होईल. तसेच पश्चिम पुण्यातील नागरिकांना शिवाजीनगर, डेक्कन, सिव्हिल कोर्ट आणि इतर मध्यवर्ती भागांशी अधिक सहज संपर्क साधता येईल," असे VTP Realty चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कार्यकारी संचालक सचिन भंडारी यांनी सांगितले.

पश्चिम पुण्यात निवासी प्रकल्पांसोबतच किरकोळ विक्री, कार्यालयीन आणि मिश्र-वापर प्रकल्पांमध्येही गुंतवणूक वाढत आहे. पुनावळे आणि मानसारख्या भागांमध्ये अलीकडील प्रकल्प घोषणांमुळे या उदयोन्मुख बाजारपेठांबाबत विकासकांचा वाढता विश्वास स्पष्ट होतो. सुधारत जाणारी पायाभूत सुविधा, सामाजिक सुविधा आणि कनेक्टिव्हिटीमुळे पश्चिम पुण्याचा विकास अधिक व्यापक स्वरूप धारण करत असल्याचे उद्योग क्षेत्राचे मत आहे.

### आयटीमुळे बाजारपेठेला बळ

राजीव गांधी इन्फोटेक पार्कमुळे हिंजवडी हे पुण्यातील सर्वाधिक मागणी असलेल्या रिअल इस्टेट बाजारांपैकी एक बनले आहे. आयटी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील हजारो व्यावसायिकांमुळे येथे निवासी मागणी सातत्याने वाढत आहे. हिंजवडी–शिवाजीनगरला जोडणाऱ्या मेट्रो लाईन ३ च्या पहिल्या टप्प्यातील १२ स्थानकांवर मे २०२६ पासून सेवा सुरू झाली असून, २३ कि.मी. लांबीच्या २३ स्थानकांच्या संपूर्ण मार्गिकेचे काम पूर्णत्वाकडे वाटचाल करत आहे. गणेशखिंड रस्ता रुंदीकरण आणि बाणेर–शिवाजीनगर डबल डेकर उड्डाणपूल यांसारख्या प्रकल्पांमुळे शहराच्या मध्यवर्ती भागाशी संपर्क अधिक सुलभ होत आहे.

## पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील (दादा) यांना आकुर्डीतील शिक्षण संकुलात भावपूर्ण श्रद्धांजली

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शिक्षण क्षेत्रात आपल्या दूरदृष्टीने आणि सामाजिक बांधिलकीने अमिट ठसा उमटविणारे पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील (दादा) यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी डी. वाय. पाटील शिक्षण संकुल, आकुर्डी आणि डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने भावपूर्ण श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले.**



यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. डी. वाय. पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. श्री. वाय. के. पाटील, डॉ. एन. एस. व्यवहारे, डॉ. के. टी. जाधव, कर्नल एस. के. जोशी, सीएफओ शर्मा सर आणि प्रा. मनीष भल्ला यांनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त करताना दादांसोबतच्या जिव्हाळ्याच्या आठवणींना उजाळा दिला.

दादांचे व्यक्तिमत्त्व केवळ शिक्षणमहर्षी म्हणून नव्हे, तर सामान्य माणसाच्या सुख-दुःखाशी जोडलेले संवेदनशील व्यक्तिमत्त्व म्हणूनही ओळखले जात होते. 'शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे' या विचारातून त्यांनी ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

दादांनी रुजविलेल्या शिक्षण, सेवाभाव, सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीच्या मूल्यांचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असा संकल्प यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

यावेळी डी. वाय. पाटील शिक्षण संकुल तसेच डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी परिवारातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हजारो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारे व्यक्तिमत्व..!

दादांची दूरदृष्टी, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि माणसे जोडण्याची विलक्षण क्षमता यांचा यावेळी विशेष उल्लेख करण्यात आला. त्यांनी उभ्या केलेल्या शिक्षणसंस्था म्हणजे केवळ इमारती नसून हजारो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारी केंद्रे आहेत, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# नोकरी मागणारे नव्हे, नोकरी देणारे बना

## विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून उद्योजकतेचा ध्यास घ्यावा; 'इंडक्शन प्रोग्राम २०२६

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**"पदवी घेऊन नोकरी करण्यापेक्षा आपण इतरांना रोजगार देऊ शकतो का, याचा संकल्प विद्यार्थ्यांनी आतापासूनच करावा. मोठी स्वप्ने पाहा, अपयशाला घाबरू नका आणि ज्ञानासोबत आवश्यक कौशल्ये आत्मसात करा," असे आवाहन उद्योगपती व समाजसेवक शैलेश शहा यांनी केले.**



यावेळी सामाजिक कार्यकर्ते व शिक्षणतज्ज्ञ जगन्नाथ (नाना) शिवले, प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे सचिव डॉ. दीपक शहा, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया, प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, उपप्राचार्या डॉ. जयश्री मुळे, एमबीएचे संचालक डॉ. सचिन बोरगावे, प्रतिभा ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे, बी.एड.च्या प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम, समन्वयिका डॉ. श्रुती गणपुले यांच्यासह प्राध्यापक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते जगन्नाथ (नाना) शिवले यांनी विद्यार्थ्यांना आई-वडिलांनी पाहिलेली स्वप्ने पूर्ण करण्याचे आवाहन केले. "अडचणीच्या प्रसंगी खचून जाऊ नका. माणसे ओळखायला शिका आणि आपल्या जबाबदारीचे भान ठेवा," असा संदेश त्यांनी दिला.

संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा यांनी महाविद्यालयीन शिक्षणाची तीन वर्षे विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. नियमित महाविद्यालयात उपस्थित राहणे, ग्रंथालयात अभ्यास करणे, प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेणे आणि शिक्षणासोबत व्यवहारज्ञान व पूरक कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

"आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ पदवी पुरेशी नाही. औद्योगिक व कॉर्पोरेट क्षेत्रात आवश्यक कौशल्ये आत्मसात केली तरच भविष्यात स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करता येईल. या तीन वर्षांत अभ्यास करा, कष्ट करा, जिद्द बाळगा आणि ध्येयापासून दूर जाऊ नका," असे आवाहन डॉ. शहा यांनी केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी यांनी केली, तर स्वागतपर भाषण उपप्राचार्या डॉ. जयश्री मुळे यांनी केले. विद्यार्थ्यांनी गणेशवंदना, 'महाराष्ट्राची लोकधारा' तसेच बॉलीवूड नृत्य आदी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. 'माइंड स्पार्क' स्पर्धेतील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नव्या दंडवाणी व प्रा. कानन पडते यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. राजश्री ननावरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### अभ्यासासोबत मोठी स्वप्ने पाहा

मार्गदर्शन करताना शैलेश शहा म्हणाले, "प्रत्येक आई-वडिलांची इच्छा असते की, आपल्या मुलाने चांगले शिक्षण घ्यावे आणि आयुष्यात यशस्वी व्हावे. मात्र, विद्यार्थ्यांनी केवळ नोकरी मिळविण्याचे ध्येय न ठेवता भविष्यात इतरांना रोजगार देण्याचा विचार करावा." दैनंदिन अभ्यासासोबत मोठी स्वप्ने पाहा, मोबाईलचा वापर करा; मात्र त्याचे गुलाम बनू नका, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना दररोज काहीतरी नवीन शिकण्याचा, यशस्वी व्यक्तींची पुस्तके वाचण्याचा आणि नियमित व्यायाम करण्याचा सल्ला दिला. अडचणीच्या काळात साथ देणारी आणि योग्य मार्गदर्शन करणारी मैत्री निवडावी, असेही त्यांनी सांगितले.

## महापौर रवी लांडगे यांचा समाजोपयोगी उपक्रमांचा संकल्प

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पात झालेल्या दुर्दैवी अपघातात नऊ कामगारांचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांनी यंदाचा आपला वाढदिवस साधेपणाने साजरा करण्याचा कौतुकास्पद निर्णय घेतला आहे. येत्या १५ ऑगस्ट रोजी त्यांचा वाढदिवस असून, वाढदिवसानिमित्त कोणत्याही प्रकारचा अनावश्यक खर्च, जाहिरातबाजी, पोस्टर्स किंवा बॅनरबाजी न करण्याचा संकल्प त्यांनी केला आहे.**



"वाढदिवसाच्या शुभेच्छांसाठी होणारी जाहिरातबाजी, पोस्टर्स आणि बॅनरबाजी टाळून त्याऐवजी समाजासाठी विधायक आणि उपयोगी कार्य करण्याचा आमचा संकल्प आहे, सर्व नागरिक, कार्यकर्ते, हितचिंतक आणि स्नेही यांनी या सेवाकार्यात सहभागी व्हावे, वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य आणणे, हीच माझ्यासाठी वाढदिवसाची खरी भेट असेल"
**- रवी लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

वाढदिवसाचा उत्सव करण्याऐवजी रक्तदान शिबिर, महाआरोग्य शिबिर, दिव्यांग बांधवांना आवश्यक साहित्याचे वाटप तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या माध्यमातून समाजातील गरजू नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

मोशी दुर्घटनेत प्राण गमावलेल्या नऊ सहकाऱ्यांच्या दुःखद निधनामुळे यंदाचा वाढदिवस उत्साहात साजरा न करण्याचा निर्णय घेतल्याचे महापौर रवी लांडगे यांनी स्पष्ट केले. दिवंगत सहकाऱ्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करत त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी अनावश्यक खर्च टाळून देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून तोच निधी समाजोपयोगी आणि लोकहिताच्या उपक्रमांसाठी वापरण्याचा संकल्प महापौर रवी लांडगे यांनी केला आहे.

## आकुर्डी-निगडीतील शाळांबाहेर वाहतूक कोंडीचा विळखा

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

निगडी, प्राधिकरण, आकुर्डी या परिसरामध्ये अनेक नामांकित शाळा, महाविद्यालये असून, बहुतांशी शाळा या लोकवस्तीच्या मध्यवर्ती ठिकाणी आहेत. साधारणतः शाळा भरतेवेळी व सुटतेवेळी शाळा, महाविद्यालयांसमोर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊन पालक-विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून रस्ता पार करावा लागतो. तसेच वाहतूक कोंडीमुळे पालकांसह विद्यार्थी व वाहनचालक त्रस्त आहेत. येथील कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक विभागाने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका परिसरामध्ये विकासकामांचा धमाका सुरू असून, अनेक रस्ते विकासकामामुळे अरुंद बनले आहेत. त्यात विविध ठिकाणी होणारे अतिक्रमण यामुळे वाहतुकीस अडथळा येत आहे. त्यातच आकुर्डी, निगडी परिसरात सातत्याने मुख्य व अंतर्गत रस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. सीएमएस विद्यालय, निगडी, म्हाळसाकांत विद्यालय आकुर्डी, रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी विद्यालय निगडी, कॅम्प एज्युकेशन सोसायटी, सरस्वती विद्यालय, सिटी प्राईड, केंब्रिज इंटरनॅशनल स्कूल, या शाळा मध्यवर्ती लोकवस्तीत असून, शाळा भरते व सुटतेवेळी वेळी खासगी चारचाकी, दुचाकी, शालेय परिवहन वाहतूक व्यवस्थेमुळे हमखास वाहतूक कोंडी होते.

DTE Code
6310

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |

Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**



Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507